REGISTERED No. B. 3434


१०० वर्षांच्या अनुभवानें उत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा
डॉ. वामनगोपाळ यांचा
सार्सापरिला


# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २ एप्रिल १९४७ अंक १४



डुप्लीकेटर्स घरगुती छपाईचें उत्कृष्ट यंत्र !


फक्त एका वर्षाच्या प्रिंटिंगच्या खर्चांत विकत मिळणारें, साधें व सुटसुटीत, हरकामी, लहानमोठे व्यापारी, कारखानदार, शिक्षण व इतर संस्था, क्लब्ज वगैरेंना नेहमीं लागणारें प्रिंटिंगचें काम या यंत्रावर सुबक रीतीनें मिळतें. कॅश मेमोज, बिल फॉर्मस्, सर्क्युलर्स, दर पत्रकें, हँडबिल्स, परीक्षेचे पेपर्स वगैरे सर्व प्रकारचीं व सर्व भाषेंतील प्रिंटिंगचीं कामें या यंत्रावर होतात.

अधिक माहिती व किंमतीबद्दल आजच लिहा.

—कारखानदारः—

शेवडेज कॅमेरा वर्कर्स लि.

ठळकवाडी, बेळगांव


अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी



आरको

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तु

आरको निलगिरी तेल

लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४



तयार कपड्यांचे व्यापारी

महिंद्रकर ब्रदर्स

गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें



—सर्व प्रांतांतील—
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

पुणें–प्रदर्शनांतील स्टॉल नं. २४० पहाण्यास विसरूं नका.

## विविध माहिती

**हैद्राबाद स्टेट बँक**—हैद्राबाद स्टेट बँकेनें आपली एक शाखा मुंबई येथें उघडली आहे. तिच्या निजाम हद्दींत ३४ शाखा असून त्यांत आणखी भर घालण्यांत येणार आहे.

**जपानी कापडाची आयात होणार**—जपानी लोकांना शक्य तेवढें कमी कापड देऊन हिंदुस्थान व पूर्व आशियांतील देश ह्यांचेकडे कापड निर्गत करण्यांत यावें अशी जनरल मॅकआर्थर ह्यास फार ईस्टर्न कमिशननें सूचना दिली आहे. तिला अनुसरून जपान्यांना यापुढें दरसाल प्रत्येकीं २½ पौंड कापड मिळूं शकेल.

**बँक ऑफ इंडियाची लंडन कचेरी**—बँक ऑफ इंडियानें लंडन येथें कांहीं महिन्यांपूर्वी कचेरी उघडली, तिनें पहिल्या सहामाहींत उत्तेजनकारक प्रगति केली आहे.

**ग्रेट ब्रिटन जपानी कापड घेणार**—जपानी गिरण्यांत विणलेलें ५ कोटि वार कापड ग्रेट ब्रिटन विकत घेणार आहे. अमेरिका जपानला कच्चा माल पुरवील व त्यापासून हें कापड बनविलें जाईल. अर्थात् वॉशिंग्टन ( अमेरिका ) येथेंच वाटाघाटी पुऱ्या करण्यांत येणार आहेत.

**गुप्त करारांचें प्रसिद्धीकरण**—इंग्लंड, अमेरिका आणि रशिया यांच्यांत झालेल्या याल्टा व पॉटसडॅम येथील करारांचें संपूर्ण प्रसिद्धीकरण अमेरिकेनें केलें आहे. तेहरान करार मात्र प्रसिद्ध करण्यांत येणार की नाहीं तें ठरलें नाहीं.

**थंडीमुळें फळांचा नाश**—फ्लारिडांत थंडीचा कडाका पडल्यामुळें १, कोटी ३० लाख फळांच्या पेट्या व बराच भाजीपाला यांचा नाश झाला. नुकसानीचा आंकडा सुमारे १२ लाख, ६० हजार डॉलर्स आहे असा अंदाज करण्यांत आला आहे.

**ब्रह्मदेशाची तांदूळ निर्यात**—ब्रह्मदेशांतील कम्युनिस्टांनीं तांदूळ आणि भात यांची लूट केल्यामुळें तांदुळाची निर्यात ५० टक्क्यांनीं घटेल असें ब्रह्मदेशच्या गृहमंत्र्यांचें म्हणणें आहे.

**माजी व्यापार मंत्र्यांचें निधन**—हिंदुस्थान सरकारचे माजी व्यापारमंत्री डॉ. अझीझउल हक मेंदूंतील रक्तस्रावानें निधन पावले. बंगालच्या आर्थिक जीवनासंबंधीं त्यांनीं एक पुस्तक लिहिलें होतें.

**ब्रह्मदेशांतील हिंदुस्थानचें येणें**—ब्रह्मदेशाकडून हिंदुस्थानचें २५ कोटी रुपये येणें आहे. उभय सरकारांत यासंबंधीं वाटाघाटी चालू असून हें देणें माल निर्यात करून देण्यांत येण्याचा संभव आहे. हा मार्ग ब्रह्मदेशाच्या इंग्लंडमधील पौंड शिलकेंतून कर्ज फेडण्याचा एक पर्यायच होऊं शकेल.

**दि यूनियन बँक ऑफ कोल्हापूर लि.**—वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९४६ अखेर संपलेल्या वर्षीं २३ लाखांच्या खेळत्या भांडवलावर ४२, ३६३ रु. निवळ नफा झाला. गेल्या वर्षीं तो २८ हजारांहून कमी होता. रिझर्व्ह फंडांत १२ हजार रु. व बॅडडेट आणि कॉन्टिन्जन्सी फंडांत ८ हजार रु. टाकून भागीदारांना ९% ( इनकम टॅक्स वजा करून ) डिव्हिडंड जाहीर करण्यांत आलें. बँकेकडे एकूण ठेवी २० लक्ष, ८७ हजारांच्या आहेत. बँकेनें ८ लक्ष, ६१ हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत. श्री. चुनीलाल परमार हे बँकेचे चेअरमन असून श्री. सी. जी. श्रीखंडे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

**निकेलचीं नाणीं**—डिसेंबर, १९४६ अखेर निकेलच्या अर्ध रुपयांचीं २ कोटि, ९१ लक्ष नाणीं व पावल्यांचीं ४ कोटि, ९८ लक्ष नाणीं काढण्यांत आलीं आणि अनुक्रमें १ कोटि, ११ लक्ष व १ कोटि, ९२ लक्ष नाणीं व्यवहारांत खेळूं लागलीं.


# दि बँक ऑफ औंध लि.

( औंध संस्थानांत स्थापन झालेली. भागीदारांची जबाबदारी नियमित )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | ... रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल ... | ... रु. ३,०९,१२० |
| भरणा झालेलें भांडवल | ... रु. १,५४,५६० |
| खेळतें भांडवल ... | ... रु. २०,००,००० चेवर |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... रु. ७३,१०० |

रजिस्टर्ड ऑफिसः—औंध

—मुख्य बिझिनेस ऑफिसः—

१६८, भवानी पेठ, पॅलेस स्ट्रीट, सातारा शहर.

—शाखा—

आटपाडी, बिचूद रे. स्टे. व ओगलेवाडी.

संचालक मंडळ

१. श्री. मा. रा. जोशी, पुणें, ( अध्यक्ष ). २ श्री. रा. बा. बिद्री, औंध. ३. श्रीमंत बापूसाहेब पंत, औंध. ४. श्री. दिवाणबहादूर मो. बा. मुथा, सातारा. ५ श्री. रावसाहेब कृ. दि. माजगांवकर, सातारा. ६ शेठ कालीदास भाईचंद, सातारा. ७ श्री. व. श्री. सातवळेकर, औंध. ८. श्री. शेठ शुभकर्ण बोत्रा, बिचूद रेल्वे स्टेशन. ९. श्री. वा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

वा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.



# कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड

डिस्टिलरी लवकरच सुरू होणार

ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

६% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विकणें आहेत.

—संचालक मंडळ—

रावबहादुर व्ही. व्ही. यारगोप, बी. ए., एलएल. बी., दिवाण, मिरज ज्यूनिअर स्टेट; श्री. डी व्ही. गर्दे, बी. ए., एलएल. बी., डिस्ट्रिक्ट जज्ज व हुजूर चिटणीस, मिरज ज्यूनियर स्टेट; श्री. एस. एस. निसळ, अहमदनगर; श्री. एन. एस. गोडबोले, पुणें; श्री. के. बी. देसाई, कोल्हापूर; सरदार व्ही. बी. महागांवकर, कोल्हापूर; राजा बी. एल. सरदेसाई, वंटमूरी; दिवाणबहादुर एस. डी. मानवी, गदग; श्री. एस. जी. मराठे, बी.ई., पुणें; श्री. बी. बी. पोतदार, बी.ए., एलएल.बी., बेळगांव; सरदार के. आर. विंचूरकर, ( एक्स-ऑफिशिओ ) पुणें. अधिक माहितीसाठी लिहा—

कृष्णा—कित्तूर, जिल्हा बेळगांव. | विंचूरकर आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस्.

# अर्थ

बुधवार, ता. २ एप्रिल, १९४७




प्रा. वा. गो. काळे


संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## शेअर बाजाराची दुर्दशा

मुंबईचा शेअर बाजार १८७३ साली स्थापन झाला. तेव्हांपासून बाजारांत आतांपर्यंत किती गंडांतरें येऊन गेलीं त्याची गणती करणें कठीण आहे. ठोकळ मानानें दरसाल बाजार घायकुतीला एकदा तरी येतोच. प्रथम कांहीं चांगल्या घटनेमुळें भाव चढूं लागतात. हळू हळू जनता सट्टयांत खेचली जाते, ती गोवली गेल्यानंतर धंदेवाईक सटोडिये कॉर्नर वगैरे प्रकार करून बेसुमार भाव वर खेचतात. एकसारखे वर जाणारे भाव व त्यांत गोवली जाणारी जनता सरकार आणि बाजारचे अधिकारी उघड्या डोळ्यांनीं पहात असतात व एकवेळ सरकारचें बेसुमार चढणाऱ्या भावांकडे लक्ष गेलें नाहीं म्हटलें तरी अधिकाऱ्यांना जनतेची कत्तल पुढे निश्चित होणार हें कळत नाहीं असें नाहीं. पण कोणास ठाऊक, चालूं पद्धतच अशी आहे, कीं अगोदर बेसुमार भाव चढूं द्यावयाचे, पर्यायानें अज्ञ जनतेला सट्टा खेळण्यास उत्तेजन द्यावयाचें आणि मग धंदेवाईकांनीं भावांची ठोकाठोक करून क्षणांत भाव चांगलेच खालीं पाडावयाचे आणि सर्वसाधारण गुंतविणाराला सखसुरत, कायदेशीर डुबवावयाचें. पुष्कळशा जातभाईंचे यांत खिसे भरले जातात, पण बाजारचें बूड एकदां निसटलें कीं मग वळण पटणें कठीण होतें आणि भावांना कसें वाचवावयाचें याचा विचार करण्याकरतां बाजार बंद ठेवावयाचे, सरकारकडे संरक्षणाकरतां धांव घ्यावयाची, छा–छू–जा–जू करून कसेंतरी प्रसंगांतून निसटून जाऊन पुन्हां येरे माझ्या मागल्या करण्यास तयार ! मागच्या वर्षीच पहा. बेसुमार भाव चढले तरी अधिकाऱ्यांनीं ब्रहि काढला नाहीं. आणि आतां भाव शून्याकडे द्रुतगतीनें चालले असतां कोण धावाधाव चालली आहे, कितीक दिवाळीं वाजलीं आहेत, गुंतविणारांची कोण नुकसानी झाली आहे, किती बँका उडाल्या आहेत. बाजारच्या सदस्यांनीं हजारवेळा आतांपर्यंत नियम धाब्यावर बसवून खाजगींत बाजार खेचले आहेत, पाडले आहेत, पटावट केली आहे आणि दिवाळी टाळण्याकरता आणेवारी केली आहे. आणि आमचें जनहिताकडे डोळ्यांत तेल घालून बसण्याचा जप चालविलेलें सरकार हा सर्व खेळ मुकाट्यानें पहात बसलें आहे. ज्या सरकारला घोड्याच्या शर्यती हानिकारक म्हणून बंद करणें जरूर वाटते, दारू पिणें विघातक म्हणून स्वतःचें उत्पन्न बुडवून दारूबंदी करणें इष्ट वाटतें, त्याच सरकारला मुंबईच्या सोनें, चांदी, रुई आणि शेअर इत्यादि बाजारांत रात्रंदिवस चाललेली सट्टेबाजी खुशाल पहावते.

मागच्या वर्षापासून चालत असलेली शेअर बाजाराची वागणूक पाहून कुठल्याहि गुंतविणाराचे मनांत शेअर बाजाराबद्दल घृणा उत्पन्न झाल्यासेरीज राहिली नसेल. चालू परिस्थितींत भाव इतके खाली येऊन सुद्धां, अंदाजपत्रकामध्यें स्वागतार्ह सुधारणा झालेली असतां, नवे व्हाईसराय पदाधिकृत होऊन सर्व जमातीच्या पुढाऱ्यांना गांधीभेटीला बोलवून राजकीय परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न करीत असतांना, गुंतविणारे अजूनसुद्धां उत्तमोत्तम शेअर मातीमोलानें मिळत असतांना बाजाराकडे ढुंकून पाहावयास तयार नाहींत. याचा अर्थ त्यांचा शेअरबाजारावरील विश्वास साफ उडालेला आहे. याला तात्कालिक कारण जरी अंदाजपत्रक हें असलें तरी चालू दुर्दशेचें बीज सट्टेबाजांच्या बेताल वागणुकींत आणि सरकार व बाजारचे अधिकारी यांच्या दुर्लक्षांतच आहे आणि त्याबद्दल शेअर बाजारचे अधिकारी तीव्र निषेधास पात्र आहेत. अधिकाऱ्यांची नेहमींची तऱ्हा अशी आहे कीं कोणी असा निषेध केला असतांना आपण केलेल्या बाजाराला वांचविण्याच्या प्रयत्नाकडे बोट दाखवून स्वतःची पाठ थोपटून घेऊन निषेध करणारांवर बेजबाबदारपणाचा आरोप करावयाचा; मात्र आपण पूर्वी केलेलीं दुर्लक्षादि पापें तीं मात्र झांकून ठेवावयाचीं; अधिकाऱ्यांच्या बरोबर शेअर बाजारांतील कांहीं सदस्य नीति-अनीतीची मुळींच चाड न बाळगतां स्वतःच्या तुमड्या कशा भरतां येतील अथवा अडकलेली मान कशी मोकळी करतां येईल याच प्रयत्नांत असतात. आपल्यावर कांहीं जबाबदारी आहे याची त्यांना यत्किंचितहि जाणीव नसते आणि त्यांचे व्यवहार केवळ याला चढव, त्याला पाड, येवढ्यापुरतेच मर्यादित असतात. अशा प्रकारच्या एकंदर बेजबाबदार ( अ )—व्यवस्थेला हिंदुस्थान सरकार कांहीं पायबंद घालणार आहे, हा गुंतविणाराला आशेचा एक किरण आहे. पण आमची खात्री आहे कीं कुठल्याही निर्बंधाला झुगारून त्यांतून पळवाटा काढून सटोडिये आपला खेळ चालूच ठेवतील.

## साखर कारखान्यांतील कामगारांची परिस्थिति

हिंदुस्थानांतील साखरेच्या कारखान्यांतील कामगारांच्या परिस्थितीसंबंधीं रेगे–कमिटीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. अहवालांत सुमारें २२ हजार साखर कामगारांच्या जीवनाची पहाणी करण्यांत आली आहे. हें प्रमाण एकंदर साखर कामगारांच्या २६.५% एवढें पडतें. साखरेच्या कारखान्यांतील बिनकसबी कामगार हे सर्वच ठिकाणीं हंगामावर कामावर घेण्यांत येतात. इतर उद्योगधंद्यांच्या मानानें साखरेच्या कारखान्यांतील कामगारांत गैरहजेरी आणि नव्या कामगारांचा भरणा हीं कमी प्रमाणांत दिसून येतात. याची कारणमीमांसा करतांना अहवालांत पुढील मुद्दे मांडण्यांत आले आहेत. साखर कारखान्यांतील कामगार हा बहुधा कारखान्याच्या जवळपासच रहाणार असतो. साखरेचा कारखाना चालतो त्या सुमारास त्याला दुसरें काम मिळण्यासारखें नसतें. याशिवाय बहुतेक कारखान्यांतून बोनस, हक्काची रजा वगैरे सवलती असतात. १९३९ पासून कामगारांच्या वेतनांत फारशी वाढ झालेली नाहीं. त्यानंतर झालेली महागाई लक्षांत घेऊन बहुतेक कारखान्यांतून कांहीं प्रमाणांत महागाई भत्ता देण्यांत आलेला आहे. साखरेच्या कारखान्यांतून जादा वेळ काम करण्याची पद्धत दिसून येत नाहीं. साखर कारखान्यांतून कामाच्या ८ तासांच्या पाळ्या असतात; आणि त्यांतील कामगार महिन्याच्या शेवटीं बदलले जातात. काम करण्याच्या जागा आरोग्याच्या व इतर दृष्टीनें मद्रास व मुंबई इलाख्यांतील बऱ्या आहेत. संयुक्त प्रांत व विहारमधील तितक्याशा चांगल्या नाहींत. कामगारांची सांपत्तिक स्थिति हलाखीची आहे.

## ओगले ग्लास वर्क्स, लिमिटेड, ओगलेवाडी.

### शेठ चतुरभाई पीताम्बरदास शहा ह्यांचें अध्यक्षीय भाषण

रविवार ता. ९ मार्च १९४७ रोजीं ओगलेवाडी येथें कंपनीच्या ऑफीसमध्यें भरलेल्या २६ व्या वार्षिक सभेचे वेळीं शेठ चतुरभाई पीतांबरदास शहा यांचें झालेलें अध्यक्षीय भाषण:—

"सभ्य स्त्रीपुरुषहो,

आज या प्रसंगीं आपलें स्वागत करतांना मला फार आनंद होत आहे. युद्ध संपल्याला आतां एक वर्षाहून अधिक काळ लोटला असून नवीन घडी बसविली जाण्यापूर्वीच्या संक्रमण कालांतून आपण सर्व जात आहोंत. कालांतील अस्थिर परिस्थितीला तोंड देऊन आपले कारखान्याचे चालक आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत ही गोष्ट मी आपले नजरेस आणू इच्छितों. यंदांचे सालीं दगडी कोळसा व सोडाॲश इत्यादि कच्चा माल मिळण्याचे कामीं अडचणी उपस्थित झाल्या, त्यामुळें कोळशाच्या अभावीं कांचकारखान्यांकडील काम कांहीं दिवस बंद ठेवावें लागलें व त्यामुळें चालकांच्या अपेक्षा मर्यादित स्वरूपांतच यशस्वी होऊं शकल्या. तथापि यंदाचे सालचा विक्रीचा आंकडा वरील कारणास्तव अपेक्षेपेक्षा कमी दिसत असला तरी गेल्या वर्षापेक्षा रु. २,००,००० (दोन लक्ष) नीं वाढ झाली असल्याचें आपणांस आढळून येईल. यावरून आपल्या कारखान्याचें पाऊल निश्चितपणानें प्रगतीचे मार्गावर पडत आहे हें कळून येईल व ही गोष्ट समाधानकारक आहे. सध्यांच्या सामाजिक घडामोडींत कामगार वर्ग व मालक यांच्या मधील वर्गकलह भेडसावीत असतांना देखील ही गोष्ट नमूद करण्यास मला अत्यंत आनंद वाटतो कीं ओगलेवाडी येथील कामगार व मालक या उभयतांच्या समजूतदार व उदार धोरणानें व सहकार्यानें एकमेकांचे संबंध सलोख्याचे राहिलेले आहेत.

"युद्धोत्तर कालांतील बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या कारखान्याच्या वाढीचे दृष्टीनें निश्चित योजना आखल्या जात असून त्या थोड्याच दिवसांत मूर्त स्वरूपांत दिसूं लागतील.

"आपले कांच विभागाचे प्रमुख श्री. पां. कृ. मुस्कुटे यांना हिंदुस्थान सरकारनें जर्मनींतील कांच कारखाने पाहून तेथून आपले धंद्यास उपयोगी अशी यंत्र सामुग्री मिळविणेसारखी आहे काय याची पाहणी करणेसाठीं जर्मनींत पाठविलें होतें व त्यामुळें तेथील ब्रिटिश व अमेरिकन व्याप्त विभागांतील शाबूत असलेले बरेच कारखाने पहाण्याची व तेथील कामाच्या पद्धती अभ्यासण्याची त्यांना चांगली संधी मिळाली. त्यानंतर इंग्लंडमधील कांच कारखान्यांतील यंत्रसामुग्री प्रत्यक्ष काम करतांना पाहून व आमचे देखरेखीखालीं असलेले कारखान्यांतून पुढील वाढीच्या ज्या योजना आहेत त्या पूर्ण करण्याचे दृष्टीनें यंत्रांची निवड करून ते नुकतेच स्वदेशीं परत आले आहेत. तसेंच एनामल कारखान्याचे प्रमुख श्री. व्यंकटेश प्रभाकर ओगले हेही इंग्लंड, स्वीडन, नॉर्वे फ्रान्स, स्वित्झरलंड येथील एनामलचे कारखाने पाहणेसाठीं व यंत्रसामुग्री खरेदी करणेसाठीं तिकडे जाऊन नुकतेच परत आले आहेत. त्यांनाही बऱ्याच कारखान्यांतून कामाच्या पद्धती प्रत्यक्ष पाहणेची खूप संधी मिळाली. स्वीडनमधील सहसा कोणास पहावयास न मिळणारा जगप्रसिद्ध—कोकम—कंपनीचा एनामलचा प्रचंड कारखानाही पहावयास मिळाला. त्यांनींही नवीन प्रकारचीं एनामलचीं भांडीं आधुनिक पद्धतीनें तयार करणेची यंत्रसामुग्री खरेदी केली आहे. या उभयतांच्या अभ्यासाचा व अनुभवाचा उपयोग कंपनीचे वाढीचे दृष्टीनें झाल्यावांचून खास राहणार नाहीं अशी मला आशा आहे.

"कच्च्या मालाचें उत्पादन व पुरवठा याबाबत सर्वत्र हाकाटी चालूं असून ती मिळविण्या बाबतींतील परिस्थिति अजून प्रतिकूलच आहे. परंतु मला सांगण्यास आनंद वाटतो कीं कारखान्याच्या व्यवस्थापक मंडळाकडून सर्व कच्च्या मालाचा पुरेसा पुरवठा करण्याकडे अहर्निश लक्ष दिलें जात आहे. रेल्वे वहातुकीवरील निर्बंध तसेंच मालावरील निर्बंध जसजसे कमी होत जातील तसतशी परिस्थिति सुधारत जाईल. हिंदुस्थान सरकारचे पूर्वीचे धोरणांत आतां बदल झाला असून अधिकाऱ्यांची वागणूक पूर्ण सहानुभूतीची आहे व शक्य तेथें तत्परतेनें मदत होत आहे. नेहमींप्रमाणें औंध संस्थानचे अधिकाऱ्यांकडूनही तत्परतेनें मदत मिळत असून त्याबद्दल कंपनी त्यांची आभारी आहे.

"कंपनीचे डायरेक्टरांनीं प्रत्येक शेअर मागें रु. २ प्रमाणें इंटेरिम डिव्हिडंड दिलें आहे व तितकेंच म्हणजे दर शेअरला दोन रुपये असें फायनल डिव्हिडंड देण्याचें सुचविलें असून त्यांच्या सूचनेस आपण अनुमोदन द्याल अशी आशा आहे.

"मार्गांत अनेक अडचणी असून देखील म्हैसूर ग्लास अँड एनामल वर्क्स, लि. तसेंच त्रावणकोर ओगले ग्लास वर्क्स लि. यांचें काम समाधानकारक चाललें असून निश्चित प्रगति दिसत आहे."

---

### दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅन्युफॅक्चरिंग कं., लि.

ओगले ब्रदर्स लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील मंजुमेल (त्रावणकोर) येथील वरील कंपनीनें १९४६ मध्यें ४,९५,००० रुपयांचा कांचेचा माल तयार केला. कच्चा माल व जळण ह्यांच्या तुटवड्याचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. कंपनीस ठोक नफा २,२७,००६ रु. झाला, त्यांतून व्यवस्थेचे व इतर खर्च, मॅ. एजंटांचें कमिशन, नोकरांच्या बोनसची तरतूद, घसारा, कर, इत्यादींसाठी १,८५,६७० रु. वजा घालता ४२,३२६ रु. निव्वळ नफा उरतो. त्यांतून भागीदारांना ५% डिव्हिडंड देण्यास ३५,००० रु. लागतील. शेअरविक्रींत वाढव्याचे मिळालेले १ लक्ष रु. जनरल रिझर्व्हमध्यें टाकण्यांत आले आहेत. कंपनीचें वसूल भांडवल सुमारें ९ लक्ष रुपये आहे. तिचेजवळ तरता पैसा भरपूर असून, तिनें २½ लक्ष रु. बँकांकडे मुदती ठेवींत गुंतविलेले आहेत. बेल्जममध्यें विकत घेतलेलीं शीट ग्लास ड्रॉइंग मशीन्स आयात करण्यासाठी हिंदुस्थान सरकारचा लायसेन्स मिळविण्यांत आला आहे. इतरहि कांहीं यंत्रसामुग्रीच्या ऑर्डरी इंग्लंडमध्यें देण्यांत आल्या आहेत. मॅनेजिंग एजंटांचे एक प्रतिनिधि युरोप व इंग्लंड येथें गेले होते, त्यांनीं स्वतः यंत्रसामुग्री चालू असतांना पाहून तिची निवड केली आहे.

---

**भांडवल उभारणीवरील निर्बंध उठत नाहीं**—भांडवल उभारणीवरील निर्बंध चालू ठेवणारा एक ऑर्डिनन्स ता. २५ पासून अंमलांत आला. त्यासंबंधांतील कायदा असेंब्लीनें मंजूर केला म्हणजे ऑर्डिनन्स रद्द होईल.

**चेक रजिस्टर्ड-इन्शुअर्ड पोस्टानें धाडा**—पोस्टानें चेक धाडणारांनीं इन्शुअर व रजिस्टर करून पाठवावेत कारण, पोस्टांतून हे चेक लांबवून, त्यावरील क्रॉसिंग व ऑर्डर पुसून टाकून चेकची रक्कम बँकेच्या काउंटरवर गर्दीच्या वेळीं काढून घेण्याचा धंदा कांहीं लबाड लोकांनीं चालविला आहे. मुंबईच्या डे. कमिशनर ऑफ पोलीसनें मुद्दाम असा इशारा दिला आहे. कित्येक बँका पोस्ट खात्याच्या कार्यक्षमतेवर विसंबून साध्या टपालानें आपले चेक वसुलीसाठी पाठवितात. त्यांनीं ह्यांची नोंद घ्यावी.

# स्फुट विचार

## तडजोडीची नवी करयोजना

हिंदुस्थान सरकारचे अर्थमंत्री मि. लियाकत अली खान ह्यांनीं आपल्या क्रांतिकारक करवाढीच्या योजनेस असलेल्या विरोधाची तीव्रता जाणून आपल्या मूळ योजनेंत थोडी सुधारणा मान्य केली आहे. ही सुधारणा विरोधकांस समाधानकारक वाटणार नाहीं, हें उघड आहे. तथापि, करयोजनेचें फिनॅन्स बिल मध्यवर्ती असेंब्लींत नामंजूर होणार नाहीं, इतपत व्यवस्था केलेली दिसते. औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांत नवीन करांच्या योजनेनें उडवून दिलेली खळबळ तडजोडीच्या योजनेनें पूर्णपणें थांबण्याची शक्यता नाहीं. व्यापारी व औद्योगिक नफ्यावरील नियोजित कर २५% वरून १६⅔% वर आणण्यांत येत आहे. गुंतविलेल्या भांडवलावर ६% किंवा एकूण १ लक्ष रुपये ह्यापेक्षां ज्यास्त होणारा नफा आतां ह्या करास पात्र होईल, ही सवलत देण्यांत येत आहे. कंपन्या नवें भांडवल कांहीं वाढावा घेऊन विक्रीस काढतात, तेव्हां प्रीमियमची मिळणारी रकम रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत येते. ही रकम करास पात्र होऊं नये; ती कर आकारणीचे वेळीं भांडवलासमान समजली जावी, अशी हितसंबंधी व्यापारी संस्थांची सूचना आहे. भांडवली मिळकतीवरील कराची योजना सिलेक्ट कमिटीच्या बहुसंख्य सभासदांच्या रिपोर्टप्रमाणें कायम केली जात आहे आणि त्यांतहि तडजोड झाली आहे. परंतु, भांडवली स्वरूपाच्या जिंदगीचे विक्रीमुळें होणाऱ्या नफ्यावर आजवर कर नव्हता, तो आतां बसविण्यांत येत आहे ही गोष्टच अत्यंत क्रांतिकारक स्वरूपाची होत आहे. तो मागील नफ्यासहि लागू होऊं नये, ह्या सूचनेस फडणविसांनीं जुमानलेलें नाहीं.

---


## दोन विचारार्ह सूचना

हिंदी आयुर्विमा-संघटनेचे अध्यक्ष श्री. के. सी. देसाई यांनीं आपल्या मद्रास येथील भाषणांत दोन महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. विमा-कंपन्यांच्या विमानिधींचा मोठा भाग सरकारी व इतर सरकार-मान्य रोख्यांत गुंतविला जातो. त्यामुळें व्याजाचें उत्पन्न फारच कमी येतें. श्री. देसाई यांनीं अशी सूचना केली आहे कीं सरकारनें निरनिराळ्या व्यापारी-संघटनांशीं विचारविनिमय करून एक अधिकृत यादी तयार करावी. या यादींतील कंपन्यांचे भाग फंडाच्या दोन तृतीयांशापर्यंत घेण्याची सक्ती करण्यांत यावी, आणि उरलेला भाग वाटेल तसा गुंतविण्यास मोकळीक ठेवण्यांत यावी. मोठमोठ्या शहरांतून सध्या रहात्या घरांची फारच टंचाई आहे. सरकारनें विमा-कंपन्यांना घरांच्या योजना आखण्यास परवानगी व उत्तेजन द्यावें, अशी त्यांची दुसरी सूचना आहे. या सूचनेच्या समर्थनार्थ अमेरिका व कानडा देशांतील अनुभवाचा दाखला त्यांनीं दिला आहे.

---

**मुंबई सरकारच्या कर्जरोख्यांची व्यवस्था**—मुंबई सरकारनें काढावयाचे कर्जरोखे आणि मुंबई सरकारचें कर्ज ह्यांची व्यवस्था रिझर्व्ह बँकेनें पहावी, अशा अर्थाचा एक ठराव मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें फडणवीस श्री. मेहता हे मांडणार आहेत. ह्यासाठी मध्यवर्ती सरकारला स्वतंत्र कायदा करावा लागेल.

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें ज़रूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

( हें प्रॉस्पेक्टस नसून माहितीपत्रक आहे )

प्रॉस्पेक्टसची मूळ प्रत रजिस्ट्रार ऑफ जॉइंट स्टॉक कंपनीज मुंबई यांच्याकडे नोंदविली आहे

# दि ट्रिनिटी मेटल वर्क्स लि. मुंबई

( सन १९१३ च्या हिंदी कंपन्यांच्या कायद्यान्वयें स्थापन झालेली )

## अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५,००,००० पांच लाख

शेअर्स प्रत्येकीं रु. १०० चे एकूण पांच हजार ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलेले आहेत. त्यापैकीं डायरेक्टर्स, मॅनेजिंग एजंट्स, त्यांचे स्नेही व हितचिंतक यांनीं तीन लक्ष बासष्ट हजार रुपयांचे शेअर्स विकत घेतले असून एक लक्ष अडतीस हजारांचे शेअर्स विक्रीसाठी बाहेर काढलेले आहेत. अर्जा-सोबत रु. ५० प्रत्येक शेअरसाठीं, अलॉटमेंटनंतर रु. ३० प्रत्येक शेअरसाठीं, बाकीचे प्रत्येक शेअरमागें रु. २० अलॉटमेंटनंतर दोन महिन्यांनी बोर्डास योग्य वाटल्यास मागण्याचा अधिकार आहे.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ दिवाणबहादुर मोतीलाल बालमुकुंद मुथा, चेअरमन, अलाइड इलेक्ट्रिक सप्लाय कं., लि., सातारा, सातारा टेक्स्टाइल्स लि., सातारा इलेक्ट्रिक कं., लि., लॉंग लाईफ विमा कं., लि., पुणें. डायरेक्टर, वेस्टर्न इंडिया विमा कं., लि., बँक ऑफ औंध लि., गोदावरी शुगर वर्क्स, लि., मुंबई वगैरे.

२. श्री. शि. शं. सक्री, बी. ए., बागलकोट, डायरेक्टर्स बोर्डाचे उपाध्यक्ष, डायरेक्टर, युनायटेड बँक ऑफ बागलकोट, लि., कर्नाटक फिल्म्स लि., युनायटेड कर्नाटक विमा कं., लि., वगैरे.

३. श्री. मा. ग. देसाई, मुंबई, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, मॅनेजर, एस्. एन्. राजर्षि आणि कंपनी, मॅनेजिंग डायरेक्टर, लक्ष्मी टेक्स्टाइल्स लि., भोर वगैरे.

४. शेठ आबिदिन एस्. तयबजी, मुंबई., भागीदार, फतेही आणि कंपनी.

५. श्री. अ. बा. पाटील, कोल्हापूर, चेअरमन, ॲडव्हायसरी कमेटी...दि. न्यू. सिटीझन बँक ऑफ इंडिया, लि., कोल्हापूर.

६. श्री. त्र्यं. य. फडके, मुंबई., मॅ. डायरेक्टर, दि हिंद बेनिफिट प्राव्हिडंट इंश्युरन्स सोसायटी, लि., डायरेक्टर, दि सुप्रीम म्युचअल विमा कं. लि., वगैरे.

७. श्री. ल. बा. कोकणे, मुंबई, ( एक्स-आफिशिओ ) भागीदार, डुबेट चोना आणि कं., दि इंडस्ट्रिअल ऑईल्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी ऑफ इंडिया, डायरेक्टर, दि सातारा टेक्स्टाइल्स लि., दि बॉंबे बॉबिन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी ऑफ इंडिया, लि., मुंबई.

८. श्री. स. धा. चव्हाण, मुंबई, ( एक्स आफिशिओ ) डायरेक्टर, दि सुप्रीम म्युच्युअल विमा कं., लि., पुणें.

९. श्री. व. न. म्हैसूर, एम्. ए., एलएल. बी., वकील. पुणें, ( एक्स आफिशिओ ) मॅनेजिंग डायरेक्टर, दि सुप्रीम म्युचूअल विमा कं., लि., पुणें, डायरेक्टर, दि हिंद बेनिफिट प्रॉव्हिडंट इंश्युरन्स सोसायटी, लि. मुंबई, दि लाइट अँड पावर सप्लायर्स, लि., पुणें व औंध, दि पॅरमाउंट पब्लिसिटी सिंडिकेट, लि., पुणें वगैरे.

**मॅनेजिंग एजंट्स : मेसर्स, कोकणे म्हैसूर आणि कंपनी.**
३६२ अ, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई नं. ४

**बँकर्स :** { दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.
दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**ऑडिटर्स :** { मेसर्स वी. सी. अभ्यंकर आणि कं.
राजि. अकौंटंट्स, मुंबई.

**उद्देश व कार्यक्षेत्रः**—देशांत विविध उद्योगधंद्यांची गेल्या दहा वर्षांत झपाट्यानें वाढ झाली आहे. तसेंच रंग, रासायनिक द्रव्यें, निरनिराळ्या व्यापारांत लागणारीं तेलें, तयार खाद्य पदार्थ व शृंगारसाधनें यांचें निर्मितीसही उत्तेजन मिळालें. त्यांचे पॅकिंगसाठीं पत्र्याच्या निरनिराळ्या आकाराच्या डब्यांसही मागणी जोरांत येऊं लागली व टिन धंद्याचा भविष्यकाल उज्ज्वल झाला. आतांपर्यंत मोठ्या प्रमाणावर डबे तयार करण्याचे अथवा पत्र्यावर छपाई करण्याचें काम मुंबईत कांहीं थोड्या कारखानदारांनीं चालविलें आहे. परंतु मागणीप्रमाणें पुरवठा अद्याप होत नाहीं. या धंद्यातील उज्ज्वल भविष्याकडे लक्ष देऊन ट्रिनिटी मेटल वर्क्स, लि. या कंपनीचे मॅनेजिंग एजंटस मेसर्स, कोकणे, म्हैसूर व चव्हाण यांनीं सुरवातीस भागीदारींत डबे तयार करण्याचा कारखाना काढला. यापुढें हा धंदा मोठ्या प्रमाणावर वाढविण्याचें ठरवून व त्यासाठीं ठिकठिकाणचे गिऱ्हाइकांच्या सोईसाठीं प्रांतांत निरनिराळ्या ठिकाणीं कारखाने काढणें अवश्य आहे, हें पाहून त्यांनीं ही कंपनी स्थापन केली.

**शेअरहोल्डर्सचे फायदेः**—कंपनीचे कारखान्याचे मूळ भागीदारांकडून धंदा चालू परिस्थितींत घेतला आहे. त्यामुळें धंदा ताब्यांत घेतल्या दिवसापासून कारखान्याचें उत्पादन चालू होत आहे. कारखाना सर्व यंत्रसामुग्रीनें परिपूर्ण असा असून सध्यां दररोज दहा हजार डबे कारखान्यांत तयार होऊं शकतात. पहिल्या वर्षापासून कंपनी शेअरहोल्डर्सना ६ टक्के फायदा देऊं शकेल अशी संचालकमंडळाची खात्री आहे व जर ६ टक्के व्याज शेअरहोल्डर्सना देतां आलें नाहीं तर मॅनेजिंग एजन्सीचा पगार त्या प्रमाणांत कमी घेण्याचें मॅनेजिंग एजंटांनी कबूल केलें आहे. शेअरहोल्डर्सना किमान सहा टक्के फायदा दिल्याखेरीज मॅनेजिंग एजंटसना फायद्यांतील कमिशन मिळावयाचें नाहीं असा त्यांचेशीं करार झालेला आहे.

**पुढील योजनाः**—चालू धंदा ताब्यांत घेतल्यानंतर शक्य तितक्या लवकर मुंबईत अथवा उपनगरांत फॅक्टरी एरियांत स्वतःची इमारत बांधण्यासाठी कंपनी जागा विकत घेऊन तेथें आपला कारखाना हलवणार आहे. त्यासाठी सुमारें २ लाख रुपये खर्च येणार आहे. त्याचप्रमाणें तातडतोब इंग्लंड अगर अमेरिका या देशांतून डबे तयार करण्याची अद्यावत् यंत्रसामुग्री मागवून छपाईचें कामहि पुढील सालपर्यंत चालू करणार आहे. अशा रीतीनें मुंबईचे कारखान्याची तयारी चालू असतानांच या कंपनीतर्फे कोल्हापूर संस्थानांत ३ लाख रुपये भांडवलाची एक सबसीडिअरी कंपनी काढण्यांत येणार असून त्या कंपनीतर्फे कोल्हापूरजवळ दररोज पांच हजार डबे काढतां येतील असा कारखाना उभारणार आहेत. हीं कामें पूर्ण झाल्यावर खानदेशांत, नडियादचे आसपास गुजरातमध्येंही असेच कारखाने काढण्याची कंपनीची योजना आहे. या सर्व कार्यक्रमासाठीं लवकरच कंपनी दिल्ली येथील सरकारी अधिकाऱ्यांकडे आणखी २५ लाखांचे भांडवल उभें करण्यासाठीं परवानगी मागणार आहे. शेअर्ससाठीं करावयाचे अर्ज, माहितीपत्रक वगैरे मुख्य कचेरीकडे अथवा कंपनीचे बँकर्सकडे मिळतील.

रजिस्टर्ड ऑफिस,
३६२ अ, विठ्ठलभाई पटेल रोड,
गिरगांव, मुंबई नं. ४

## हिंदुस्थान सरकारचें आर्थिक व औद्योगिक धोरण

( दि प्रेसिडेन्सी इं. बँकेचे चेअरमन, श्री. ग. रा. साठे, ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेंत सरकारी आर्थिक व औद्योगिक धोरणावर कडक टीका केली. ह्या धोरणाचा संबंध बँकांच्या व्यवहाराशीं येत असल्याकारणानें, त्यांच्या भाषणांतील महत्त्वाचे मुद्दे येथें उद्धृत केले आहेत. )

### सोन्याचीं अंडीं घालणारी कोंबडी मारण्याचें धोरण

" गेल्या वर्षीच्या सभेचेवेळीं युद्ध नुकतेंच बंद झालें होतें. युद्धानंतरच्या नवीन वर्षांत परिस्थिति सुधारेल अशी जी अपेक्षा वाटत होती ती फोल होत चालली आहे. लोकमतानुवर्ती सरकार अधिकारावर येऊनहि परिस्थिति दिवसेंदिवस सर्वच दृष्टीनें बिघडत चालली असल्याचें दिसत आहे. देशाच्या प्रगतीच्या तळमळीबाबत सध्यांच्या राष्ट्रसूत्रधारांचे बाबतींत कोणीच शंका घेणार नाहीं, पण त्यांनीं आंखलेलें धोरण मात्र त्यांनीं कितीहि सद्हेतूनें आंखलेलं असलें तरी परिणामीं आर्थिक व औद्योगिक दृष्ट्या घातुकच ठरणार आहे. सध्यांचें धोरण सोन्याचीं अंडीं एकदम मिळावींत म्हणून कोंबडी मारण्यासारखें होणार आहे. हिंदुस्थान सरकारचें चालू सालचें बजेट अर्थतज्ज्ञांच्या नजरेखालून गेलें आहे अगर नाहीं याचीच शंका वाटते. तें आहे तसेंच पास झालें तर अर्थमंत्र्यांचा अडाणीपणा जगाच्या चव्हाट्यावर जाहीर होणार आहे इतकीं कांहीं कलमें आडमुठेपणाचीं आहेत. लोकमताचा विरोध पाहून बजेटाची छाननी करण्याकरितां सिलेक्ट कमिटी नेमण्यांत आली, पण सिलेक्ट कमिटीनें सुचविलेल्या दुरुस्त्याहि समाधानकारक नाहींत. सिलेक्ट कमिटींतील एका पक्षाच्या सभासदांनीं भिन्न मत नमूद केलें आहे, पण त्यांनीं केलेल्या सूचनाहि उद्योगधंद्यांचे वाढीस फारशा अनुकूल नाहींत. नवीन कर-योजनेमुळें देशाची उत्पादन शक्ति कमी होईल, देशी माल महाग पडेल, परदेशी मालाची आयात वाढेल. त्याचा परिणाम म्हणून कांहीं धंदे बंद होतील व त्यामुळें बेकारी तर वाढेलच, पण हिंदुस्थान सरकारच्या भावी उत्पादनावर त्याचा परिणाम होईल. प्राप्तीवरील कर हा गेल्या वर्षाच्या उत्पन्नावर आकारला जात असल्यामुळें यंदा बहुधा अपेक्षित नफाकर उत्पन्नांत तूट येणार नाहीं, पण नवीन धोरणाचे परिणाम पुढील वर्षाच्या अर्थमंत्र्यास मात्र चांगले भोवतील. देशहिताची दृष्टि असणारा कोणीहि सूज्ञ अर्थमंत्री भावी प्रगति खच्चीं करणारें धोरण आंखणार नाहीं. सध्याचें राजकारण इतर बाबतींत एका पक्षाच्या अडवणुकीचे धोरणानें जसें चाललें आहे तीच दृष्टि अंदाजपत्रकाचे बाबतींतही असेल तर विधिमंडळांतील विचारवंत सभासदांनीं या धोरणास प्रसंगीं अप्रियता पत्करूनहि विरोध करावयास पाहिजे.

### उत्पादन-वाढीस सहाय्य पाहिजे

" नवीन करयोजनेमुळें धंद्यांत नफा राहिला नाहीं तरीहि देशहिताकडे लक्ष देऊन औद्योगिक क्षेत्रांतील बऱ्याच व्यक्ती वाढतें उत्पादन चालूं ठेवण्यास मागें घेणार नाहींत, पण त्या दृष्टीनें कार्य करण्यासहि अडचणी कमी नाहींत. एकीकडे आमचे पुढारी उत्पादन वाढवा म्हणून सांगत आहेत, तर दुसरीकडे कच्च्या मालाचा मामुली कामापुरताहि पुरवठा करण्यांत येत नाहीं. तेव्हां उत्पादन वाढवावयाचें कसें ? इतर औद्योगिक देशांत मात्र या उलट परिस्थिति आहे. उदाहरण द्यावयाचें झाल्यास इंग्लंडचें उदाहरण देतां येण्यासारखें आहे. उद्योगधंद्यांस विजेचा पुरवठा कमी पडूं नये म्हणून घरगुती वीज-पुरवठ्यावर नियंत्रणें घालण्यांत आलीं आहेत. देशांत अन्नाची टंचाई असूनहि परदेशीं पाठविण्याकरतां बिस्किट उत्पादनाला लागणारा गहूं व साखर बिस्किट कारखान्यांस मिळत आहे. येथें मात्र गव्हाची टंचाई म्हणून बिस्किटाचे कारखाने बंद ठेवावे लागत आहेत. इंग्लंडमध्यें साखरेचें उत्पादन जवळजवळ नाहींच, पण तेथील बिस्किटस-चॉकोलेट-मिठाईचे कारखान्यांस साखर पुरेशी मिळतेच व तीहि कांहीं विशिष्ट ( परदेशीं निर्यात होणाऱ्या ) उत्पादनास येथल्यापेक्षां निम्याहून अधिक कमी दरानें. आपल्याकडे मात्र साखरेचे अनेक कारखाने असूनहि साखरयुक्त पदार्थांचे उत्पादनास साखर नाहीं अशी परिस्थिति आहे. तेव्हां देशहिताकडे दृष्टि ठेवून उत्पादन वाढवा असे नुसते आदेश देण्यानें उत्पादन वाढणार नाहीं. सरकारच्या आयात-निर्यात धोरणांतहि अशीच विसंगती दिसत आहे. इकडे उद्योगधंद्यांना संरक्षण देण्याची भाषा चालूं असतांना परदेशी माल भरमसाट आयात होऊं दिला जात आहे. त्यामुळें युद्धकालांत निघालेले किती धंदे वाढीस लागतील अगर टिकाव तरी धरूं शकतील याची शंकाच आहे. "

---

**पूर्व जर्मनींत राष्ट्रीयीकरण**—रशियनव्याप्त जर्मनींतील ब्रँडेन बर्ग प्रांताच्या पार्लमेंटनें खाणींच्या राष्ट्रीयीकरणाचा कायदा मंजूर केला.

**जागतिक बँकेकडे कर्ज मागणी**—जागतिक बँकेकडे आतांपर्यंत सुमारे ९०० कोटि रुपयांच्या कर्जाचे अर्ज आले आहेत. ही रकम बँकेच्या एकूण जिंदगीच्या तिप्पट आहे ! कर्ज मागणारांच्या यादींत फ्रान्स, झेकोस्लोव्हाकिया, चिली, डेन्मार्क, लक्झेंबर्ग, नेदरलंडस, इराण व पोलंड हे देश आहेत.

**संयुक्त राष्ट्र-संघटनेला देणगी**—अमेरिकन कोट्याधीश मि. रॉक फेलर यांनीं संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या इमारतीच्या जागेसाठीं ८५ लाख डॉलर्सची देणगी दिली. जगाची आशा या संघटनेवर खिळली असल्याचे त्यांनीं बोलून दाखविलें.

---


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : ७ सप्टेंबर, १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | : | ३,००,००,००० रु. |
| वसूल झालेलें भांडवल | : | १,५०,००,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | : | २,००,००,००० रु. |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

—शाखा—

| | | |
|---|---|---|
| अहमदाबाद | काळबादेवी | कराची |
| भद्र (मुख्य ऑफिस) | मलबार हिल | मद्रास |
| एलिस ब्रिज | कलकत्ता | नागपूर |
| माणेक चौक | क्लाईव्ह स्ट्रीट | किंग्जवे |
| स्टेशन ब्रँच | (मुख्य ऑफिस) | इतवारी बझार |
| अमृतसर | बडा बझार | पुणें |
| अंधेरी (मुंबई शेजारीं) | चौरंगी स्क्वेअर | पुणें शहर |
| वांद्रे ( मुंबई शेजारीं ) | कालिकत | पालनपूर |
| भुज ( कच्छ ) | कोइमतूर | राजकोट |
| मुंबई | हैद्राबाद ( सिंध ) | सोलापूर |
| बुलियन एक्सचेंज | जमशेदपूर | सुरत |
| कुलाबा | जुनागड | वेरावळ |

लंडन शाखा : १७, मूर गेट, लंडन ई. सी. २

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

तपशीलासाठी चौकशी करा.

बी. एन. अटल, एजंट, पुणें

ए. सी. क्लार्क, जनरल मॅनेजर

## मोटार वहातुकीचे राष्ट्रीयीकरणांत सहकारी तत्व उपयोगी पडणार नाहीं काय ?

( लेखकः—श्री. स. ग. पाटणकर, असि. रजिस्ट्रार, को. सो. सांगली. )

मोटार वहातुकीचें राष्ट्रीयकिरण करण्याच्या योजनेसंबंधीं जे मुख्य उद्देश मुंबई सरकारी पत्रकांत ता. १४-१-४७ च्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाले आहेत ते खालीलप्रमाणें आहेत:—

( १ ) मोटार—वहातूक जनतेच्या दृष्टीनें अधिक व्यवस्थित व कार्यक्षम होऊन या धंद्यांची योग्य प्रकारें वाढ व्हावी;

( २ ) ह्या धंद्यांत होणाऱ्या फायद्याचा उपयोग जनतेस व्हावा;

( ३ ) मोटारी, रेल्वे वगैरे वहातुकीच्या साधनांतील स्पर्धा नष्ट व्हावी.

हे उद्देश लक्षांत घेतां सरकारास हल्लींच्या मोटार कंपन्यांच्या मालकांचा या धंद्यांत गुंतलेला पैसा नको आहे असें नाहीं असेंच दिसून येईल. शिवाय सरकारपुढें युद्धोत्तर पुनर्घटनेच्या अन्य योजना इतक्या आहेत कीं सरकारास मोटार वहातुकीचें राष्ट्रीयीकरण योजनेसंबंधी लागणारा पैसा वांचवून तो अन्य योजनेकडे खर्च करण्यास मिळाल्यास पाहिजेच आहे. तेव्हां मोटार-कंपन्यांच्या मालकांचा या धंद्यांत जो पैसा गुंतलेला आहे त्याबद्दल सरकारची नापसंती आहे असें वाटत नाहीं. सरकारास या वाहतुकीच्या धंद्यावर, तो व्यवस्थेशीर व कार्यक्षमतेनें चालून त्यापासून होणाऱ्या फायद्याचा उपयोग सर्व जनतेला मिळावा यासाठीं नियंत्रण ठेवण्याची इच्छा आहे, असेंच प्रसिद्ध करणेंत आलेल्या योजनेवरून दिसतें. अशा स्थितींत हल्लींच्या मोटार कंपन्यांच्या मालकांचें नुकसान न होतां सरकारचेहि उद्देश सफल होण्यास कांहीं मार्ग आहे का, तें आपण पाहूं.

मोटार—वाहतुकीच्या धंद्यांत सहकारी तत्त्व गोंवून जर या धंद्याची उभारणी केली तर सरकारास राष्ट्रीयकरणाची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर पूर्णपणें न घेतां त्या योजनेमधील सर्व उद्देश साध्य करून घेतां येण्यासारखे आहेत. यासाठीं सहकारी तत्त्वावर या मोटार-वाहतुकीच्या धंद्याची उभारणी कशी करणेची याची कल्पना प्रथमतः येथें इष्ट असल्यानें ती खालीं देत आहे.

मुंबई प्रांतांतील प्रत्येक जिल्ह्याकरितां एक याप्रमाणें जिल्हा-मोटार-ट्रान्स्पोर्ट- सहकारी-युनियन् लिमिटेड या नांवाची संस्था स्थापन करणेंत येऊन, ही सहकारी कायद्याखालीं नोंदवून घेणेंत यावी. या संस्थेच्या भागांच्या भांडवलापैकीं शेकडा २० टक्के भांडवल सरकारचें, शेकडा ४० टक्के हल्लीं असलेल्या मोटारकंपन्यांच्या मालकांचें व ४० टक्के जनतेचें असें असावें. या जिल्हा युनियनचा कारभार पहाणेसाठीं ५ सभासदांचें एक कार्यकारी मंडळ असावें. या सभासदांपैकीं एक सरकारनियुक्त व बाकीच्या चारांपैकीं मोटारकंपनी—मालकांनीं निवडून दिलेले २ व जनतेपैकीं असणारे शेअरहोल्डर्सनीं निवडून दिलेले २ असे असावेत. या कार्यकारी मंडळावर देखरेख करणेसाठीं " मोटार—वहातूक—जिल्हा—कंट्रोलिंग बोर्ड " म्हणून एक मंडळ असावें. या मंडळावर प्रांताचे वहातूक मंत्री यांनी नेमून दिलेला एक, मोटारमालक व जनतेपैकीं असणारे शेअरहोल्डर्स यांनीं प्रत्येकीं निवडून दिलेला एक याप्रमाणें एकूण तीन सभासद असावेत. या कंट्रोलिंग बोर्डाचें मुख्य काम म्हणजे ज्या उद्देशानें ही सहकारी यूनियन् स्थापन करणेंत आली ते उद्देश संस्थेच्या चाललेल्या कारभारानें पूर्ण होण्यास मदत होत आहे अगर कसें तें पाहून त्यासंबंधीं कांहीं व्यावहारिक सूचना देणें जरूर वाटल्यास त्या जिल्हा यूनियन्सना देणें व अशा सूचना देऊनहि संस्थेकडून दुर्लक्ष होत असल्याचें दिसून आल्यास त्यासंबंधीं सहकारी खात्याच्या मुख्यांमार्फत, प्रांतिक वहातूक मंत्र्यांकडे कळविणें. प्रांतिक वहातुकमंत्री आपला निर्णय सहकारी खात्यामार्फत संस्थेस कळवितील व तो संस्थेवर बंधनकारक व अखेरचा असा असावा. सर्व जिल्हा यूनियन्सवर नियंत्रण ठेवून, प्रांतिक व मध्यवर्ती सरकारच्या धोरणांत एकसूत्रीपणा राखण्याच्या दृष्टीनें एक " प्रांतिक—मोटार—वहातुक—नियंत्रण—मंडळ " स्थापन करण्यांत यावे. या मंडळाचे अध्यक्ष म्हणून प्रांतांचे वहातूकमंत्रि हे रहातील व त्यांचेशिवाय या मंडळांत प्रत्येक जिल्हा—यूनियननें निवडून दिलेला एक याप्रमाणें प्रतिनिधी असावेत. या निवडून आलेल्या प्रतिनिधिशिवाय, प्रांतिक वहातूकमंत्र्यांना वाटल्यास त्यांना या धंद्यांतील दोन तज्ञ इसमांचीहि नेमणूक या मंडळावर करतां यावी अशी सोय असावी.

प्रांतांतील मोटार-वाहतुकीवर तपासणी करणेसाठीं प्रांतिक वहातुक खात्याच्या पोटीं मोटार-वाहतूक तपासणी म्हणून एक भाग उघडणेंत यावा, व त्यांत सरकारनें प्रत्येक जिल्ह्यांतील वाहतुकीच्या मानानें लागतील इतके सरकारी नोकर ( इन्स्पेक्टर्स ) नेमून द्यावेत. या इन्स्पेक्टर्सच्या पगारांपैकीं १/४ रक्कम सरकारनें सोसावी व ३/४ प्रांतांतील जिल्हा यूनियन्सकडून वसूल करण्यांत यावी. ही तपासणीची योजना नुकत्याच झालेल्या मुंबई प्रांतिक मोटार-यूनियन्स कांग्रेसच्या अधिवेशनांत संमत करणेंत आलेल्या ठरावास अनुसरून आहे असें दिसून येईल.

संस्थेचा वर्षअखेर ताळेबंद तयार झाल्यावर, सर्व खर्चवेंच भागून जो निवळ नफा राहील त्यांतून प्रथमतः रिझर्व्हफंड व घसारा-फंड काढणेंत यावा व नंतर शेंकडा सव्वासहा ( ६—४—० ) पेक्षां जास्त नाहीं अशा दरानें डिव्हिडंड देण्यांत यावें. यानंतर जर कांहीं नफा राहील तर तो, मोटार स्टँड्सवर उतारूंकरितां शेड्स बांधणें, झाडें लावण्याची व्यवस्था करणें, पाण्याची सोय करणें, अशा जनतेकरतां वाहतुकीच्या अधिक सुखसोयी करण्याकडे खर्चला जावा. रिझर्व्ह फंडाचा विनियोग सरकारच्या अगाऊ परवानगीनें, वहातुकीची वाढ होणेंसाठीं, नवीन खर्चाच्या योजना कांहीं असल्यास त्यांकडे अगर वाहतुकीसंबंधीं अन्य कांहीं योजना अधिक खर्चाच्या असल्यास त्यांकडे करण्यांत यावा.

वरीलप्रमाणें योजना अमलांत आल्यास मोटार—वहातुकीवर जरूर तें नियंत्रण राहून सदर धंद्याचें राष्ट्रीयकरण करण्याच्या योजनेंतील सर्व उद्देश सफल होण्यास मार्ग होणार आहे. तसेच या योजनेमुळें हल्लीं या धंद्यांत पुष्कळ दिवस घालविलेले असे जे मोटारकंपन्यांचे मालक आहेत त्यांच्यावर अन्याय न होतां हे लोक मर्यादित नफ्यावर संतुष्ट राहून जनतेची सेवा करण्यास उद्युक्त होतात अगर कसें हेंहि पहाणेची संधी सरकारास मिळूं शकेल.

---

**जाव्हांत हिंदु संस्कृतीचा नवा पुरावा**—मध्य जाव्हांत ११ शें वर्षांपूर्वींच्या हिंदु संस्कृतीची साक्ष देणारे कांहीं कागद सांपडले आहेत. कागदांतील भाषा संस्कृत असून ते सुमारें ८५६ इ. सनांत लिहिले गेले असावे असा तज्ञांचा अंदाज आहे.

**नेपोलियन बोनापार्टच्या केसांचा झुपका**—पॅरिसमध्यें पहिल्या नेपालिअनच्या केसांच्या उभ्या झुपक्यांचा लिलाव झाला. या नगांला १७ हजार फ्रँक किंमत आली. नेपोलिअन हेलिना बेटांत कैदेंत असतांना हा झुपका कापण्यांत आला होता असें म्हणतात.

## पेटंटसाठी अर्ज

पेटंटच्या पद्धतीस हिंदुस्थानांत १८५६ सालीं प्रारंभ झाला. १८५६, १९००, १९२५ व १९४६ सालीं पेटंटसाठी किती अर्ज आले व त्यांपैकीं हिंदी लोकांचे किती होते, हें खालील तक्ता दर्शवितोः—

| वर्ष | एकूण अर्ज | त्यांपैकीं हिंदी लोकांचे अर्ज |
|---|---|---|
| १८५६ | ३३ | ० |
| १९०० | ४९२ | ४५ |
| १९२५ | १,००० | ७१ |
| १९४६ | २,६१० | २६६ |

१९४६ सालीं हिंदुस्थानांत पेटंटसाठी अर्ज आले, त्यांची अर्जदारांच्या मूळ देशवार वांटणी खालीं दिली आहे.

| देश | त्याच्या नागरिकांनीं केलेले अर्ज |
|---|---|
| ग्रेट ब्रिटन | १,३४८ |
| अमेरिका | ४५२ |
| हिंदुस्थान | २६६ |
| फ्रान्स | ८९ |
| हॉलंड | ६९ |
| स्वित्सरलंड | ६६ |
| कॅनडा | ५१ |
| ऑस्ट्रेलिया | ५० |
| द. आफ्रिका | २५ |
| स्वीडन | २१ |
| इतर | १७१ |

पेटंटच्या १९४६ मधील अर्जदारांची वर्गवारी त्यांच्या फर्म्सच्या नांवानुसार खालीं दिली आहे.

| अर्जदार | अर्जांची संख्या |
|---|---|
| विदेशी | |
| स्टँडर्ड टेलिफोन्स अँड केबल्स लि. | २२३ |
| इंपीरिअल के. इंडस्ट्रीज लि. | ८४ |
| जनरल इ. कं. लि. | ६५ |
| ई. आय. ड्यु. पॉ. डी. नेमोर्स लि. | ६० |
| पॉवर जेट्स ( रि. अँन्ड डे. ) लि. | ५३ |
| मेट्रोपॉलिटन–विकर्स इ. कं. लि. | ३३ |
| जे. आर. गीजी ए. जी. | २७ |
| फोर्ड मोटर कं. ऑफ कॅनडा लि. | २५ |
| एन. व्ही. फिलिप्स ग्लोलँपेन फॅब्रिकेन | २४ |
| इंटरनॅशनल ज. इ. कं. लि. | २३ |
| हिंदी | |
| कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च | २७ |
| टाटा आयर्न अँड स्टील कं. लि. | १२ |

**सोनें व चांदी ह्यांवरील जकात**—सोन्याच्या आयातीवर हिंदुस्थान सरकारनें १९४६ च्या फिनॅन्स ॲक्टान्वयें प्रथम २५ रु. तोळा ह्या दरानें जकात बसविली. १२ ऑगस्ट १९४६ पासून ती १२ रु. ८ आ. तोळा करण्यांत आली. चांदीवरील जकातीस १८९४ मध्यें प्रारंभ झाला, तेव्हां तिचा दर ५% होता. मार्च १९४६ ते फेब्रुवारी १९४७ ह्या मुदतींत सोन्यावरील जकातीचें उत्पन्न ३४,१४,२९५ रु. भरलें व चांदीवरील जकातीनें १७,८६,१७० रु. दिलें.


—सुरवातीच्या—

**अवघ्या ४ महिन्यांत कंपनीनें ५ लाखाचें वर काम मिळविलें.**

**कॉन्टिनेन्टल म्यूच्युअल**

**विमा कंपनी लिमिटेड, मुंबई**

या प्रगतिमान कंपनींत आपला विमा उतरून आपलें जीवन निर्वेध करा.

ठिकठिकाणीं अत्यंत सवलतीच्या अटीवर एजन्सीज व स्पेशल एजन्सीज देणें आहेत. खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

कृ. गो. परोपकारी
मॅनेजिंग डायरेक्टर
६५, सरस्वती विलास, लक्ष्मी रोड, पुणें २

**दि व्हलकन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स काँपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार









## कारखान्यांच्या कायद्यांत सुधारणा

मध्यवर्ती विधिमंडळाच्या चालू अधिवेशनांत कारखान्यांच्या कायद्यांत बऱ्याच सुधारणा करणारें एक बिल सरकारतर्फे प्रविष्ट करण्यांत येणार आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रांतांच्या कारखाना तपासनविसांची एक परिषद नुकतीच दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. या परिषदेंत विचारविनिमय होऊनच नव्या बिलांतील कलमें तयार करण्यांत आलेली आहेत. नवीन बिलांत मुख्यतः चार प्रकारच्या सुधारणा करण्यांत अगर सुचविण्यांत आल्या आहेत. सुधारणाविषयक बाबी पुढीलप्रमाणें आहेत. (१) कारखान्याविषयक कायद्याची व्याप्ती वाढविणें, (२) कायद्याची अंमलबजावणी करतांना प्रांतिक सरकारें व अधिकारी वर्ग यांना नियमांच्या संदिग्धपणामुळें होणाऱ्या अडचणी शक्य तों नाहींशा करणें (३) सध्याच्या कायद्यांतील आरोग्यविषयक कलमें अधिक कार्यक्षम करणें आणि (४) जरूर तेथें प्रांतिक सरकारांना विशिष्ट प्रकारची सत्ता देणें. बिलांत प्रत्येक कारखान्याच्या नोंदीची आणि परवाना घेण्याची सक्तीची योजना केलेली आहे.

सध्याच्या कायद्यांत असलेल्या कारखान्याच्या व्याख्येमुळें पुष्कळसे कारखाने कायद्याच्या कक्षेबाहेर रहातात आणि त्यामुळें कमींत कमी पगार, कामाचे तास, दिवाबत्ती व मोकळी हवा, खेळण्याची व्यवस्था इत्यादि बाबतींत कारखान्यांवर सक्ती करतां येत नाहीं. नवीन कायद्याच्या मसुद्यांत वरील बाबींसंबंधीं सुधारणा करून जवळ जवळ सर्व कारखान्यांना त्या लागू करण्यांत येणार आहेत असें असलें तरी इतर बाबतींत नवीन कायदा प्रेरक शक्ति (पॉवर) वापरणाऱ्या व १० किंवा अधीक कामगार असणाऱ्या कारखान्यांना लागू करण्यांत येणार आहे. शक्ति न वापरणाऱ्या परंतु २० किंवा अधिक कामगार नोकरीवर असणाऱ्या कारखान्यासहि नवीन कायदा लागू होणार आहे. बांधकामाचा धंदा, स्थापत्याचे कारखाने, गोद्या इत्यादि संस्थाहि या कायद्याच्या चौकटींत येणार आहेत. त्याशिवाय आतांपर्यंत करण्यांत येणारा कायमचे व हंगामी कारखाने हा फरकहि रद्द करण्यांत येणार आहे. मुलांना कामावर ठेवण्याच्या वयाची मर्यादा १२ च्या ऐवजीं १३ ठेवण्यांत यावयाची आहे. त्याचप्रमाणें मुलांच्या कामाच्या तासांतही अर्ध्या तासाची कपात करण्यांत यावयाची आहे. कामाचे तास ५ ऐवजीं ४½ तास ठेवण्यांत येणार आहे. शिवाय धोक्याच्या कामांत गुंतलेल्या मुलांचे कामाचे तास वाटल्यास अधिक कमी करण्याचे अधिकार प्रांतिक सरकारांना देण्यांत येणार आहेत.

सध्याच्या कायद्यांत एक प्रमुख दोष असा आहे कीं त्यांत कायद्याखालीं नियम करण्याच्या अधिकारान्वयें प्रांतिक सरकारावर अनिश्चित स्वरूपाच्या जबाबदाऱ्या टाकण्यांत आलेल्या आहेत. त्या ऐवजीं नवीन कायद्यांत कांहीं विशिष्ट बाबतींत स्पष्ट कलमें करून तीं मूळ कायद्यांतच समाविष्ट करण्यांत येणार आहेत. उदाहरणार्थ, कामगारांचें आरोग्य, सुरक्षितता आणि सौख्य या बाबतींत निश्चित नियम करण्यांत येणार असून त्याशिवाय जरूर तेथें प्रांतिक सरकारांना त्याच बाबतींत जादा नियम करण्याचे अधिकार दिले जातील. सध्याच्या कायद्यांत असलेले कामगारांच्या आरोग्यविषयक नियम अपुरे आहेत असें आढळून आलें आहे. त्या नियमांची व्याप्ती वाढविण्यांत येणार आहे. उदाहरणार्थ, एकादें अल्पवयी मूल कारखान्यांत काम करण्यास आरोग्यदृष्ट्या योग्य आहे असे पहिल्यानें ठरविल्यावर पुढें अशा कामगाराच्या आरोग्यावर मुळींच नजर रहात नाहीं. नवीन कायद्यांत मुलें आणि १८ वर्षांपर्यंतचे कामगार ह्यांची वार्षिक वैद्यकीय तपासणी करण्याचा अधिकार अधिकृत डॉक्टरला देण्यांत आलेला आहे. वैद्यकिय तपासनिसाला एकाद्या कामगाराच्या आरोग्याविषयीं शंका आल्यास वर्षाच्या आधींहि त्याला त्या कामगाराची तपासणी करतां येईल. एकंदरीनें, नवीन कायद्याचा मसुदा हल्लींच्या कायद्यापेक्षां बराच प्रगतिकारक असून, जुन्या कायद्यांतील दोष काढून टाकून कामगारांच्या हिताच्या दृष्टीनें त्यांत बरीच सुधारणा करण्यांत आली आहे. विधिमंडळांत मसुदा मांडण्यांत येईल त्यावेळीं मजूर सभासदांकडून त्यांत आणखीहि सुधारणा सुचविल्या जातीलच.

**दुधाची पूड हिंदुस्थानांत करण्याचा प्रयत्न**—हिंदुस्थानांत दुधाची पूड तयार करण्याचे प्रयोग हिंदुस्थान सरकार करणार आहे. आनंद येथील सरकारी केंद्रांत दर ताशीं ७५ गॅलन शक्तीची यंत्रसामुग्री बसविण्यांत येईल. दोन वर्षेपर्यंत ही योजना चालू राहून हिंदी परिस्थितीस योग्य अशी उत्पादन पद्धति योजण्यांत येईल. "हिंदुस्थानांतील कांहीं विभागांत दुधाचा पुरवठा मुबलक असला तरी तें ग्राहकांस पोचवितां येत नाहीं; अशा केंद्रांतून दुधाची भुकटी तयार करण्याचे कारखाने स्थापन केले, तर दूधवाले व ग्राहक ह्या दोघांचाहि फायदा होईल अशी अपेक्षा आहे." ह्या योजनेस ८५,००० रु. भांडवली खर्च येईल आणि दोन वर्षे योजना चालू ठेवण्यास १,०३,००० रु. लागतील.

**"ए. बी. सी." बँकेबाबत अर्ज**—"ए. बी. सी." च्या संबंधीं सर्व अर्ज विचारांत घेऊन, हायकोर्टानें बँकेस आपली हिशेबाचीं सर्व पुस्तकें शाखांकडून मागवून कंपन्यांच्या रजिस्ट्रारच्या स्वाधीन करण्याचा हुकूम दिला आहे. ता. २ एप्रिल ही पुढची तारीख नेमण्यांत आली आहे.


कंपनीच्या पहिल्याच वर्षीच्या ऊंसगाळणीस सुरुवात होऊन अद्ययावत् पद्धतीचा एकजिनसी गूळ तयार होऊं लागला.

**पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लिमिटेड**

रजिस्टर्ड ऑफिस व फॅक्टरी : पोस्ट–कुरोली, (जि. सोलापूर)

अधिकृत भांडवल : रु. १०,००००० (दहा लाख)
विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ५,००००० (पांच लाख)

पुढीलप्रमाणें—१०००—५ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकी रु. १०० चा. ६००० "बी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकी रु. ५० चा. १०००० "सी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येक रु. १० चा ("सी" क्लासचे सर्व शेअर्स खपले आहेत.)

**—शेअर्सची विक्री चालू आहे—**

त्याच्या रकमा पुढीलप्रमाणें भरावयाच्या आहेत.

अर्जासोबत शेअर्सच्या ¼ व अर्जमंजुरीनंतर ¼ व उरलेली रक्कम प्रत्येक कॉलमध्यें तीन महिन्यांपेक्षा कमी अंतर नसलेल्या दोन हप्त्यांनी.

★ कंपनीस मिरज (ज्यु.) दरबारनें १५ वर्षे इन्कमटॅक्स माफ केला आहे व इतर सवलती देऊन रु. २५,००० चे शेअर्स घेतले आहेत.

★ पहिल्याच वर्षी कंपनी १० टक्के डिव्हिडंड देण्याची हमी घेत आहे. शेअर-फॉर्म, माहितीपत्रकें याकरितां वरील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स : जे. व्ही. ताम्हनकर आणि कंपनी.

इन्फर्मेशन ऑफिसेस :

पुणें—लक्ष्मीरोड, गणपति चौक, बुधवार, नं. ६२, पुणें २.
पंढरपूर—नवी पेठ, पंढरपूर.

व्याज-वजा
+ कोहिनूर रु. १३ दि. २५-३-४७
गोकाक रु. १२ दि. ७-४-४७

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

साप्ताहिक बंद भाव

व्याज-वजा
अपोलो रु. ०-४-० दि. ३१-३-४७
बॉम्बे डाइंग-बोनस शेअर + रु. ४० दि. ७।४।४७
फिनले रु. १५ दि. २५।३।४७

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २५।३।४७ | बुधवार २६।३।४७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २४१७८; २१२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २३४० | २२७०.० |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४२७ | ४१५ |
| ६५; ३६-४ | ०-८- S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २८-८ | २७-० |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३७-२ | ३६-० |
| | 'बोनस शेअर' | | | | | |
| ३२७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | २३२० | २२७० |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ७५०+ | ७२८ |
| ९९९; ६६० | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६५२ | ६२० |
| ५६७; ३९८ | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३१७ | ३०५ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३२१ | ३१३ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३२१ | ३०४ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३२० | ३०३ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-९ | ४-७-६. |
| २९-१; १६-१२ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६-७ | १५-७ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३-११ | ३-७-६ |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६२७-८ | ५७० |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १८४-८ | १७६-८ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २५९ | २४७ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४८० | ४६५ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३२-१३ | ३१-८ |

सोमवार दि. २४-३-४७ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | १७२-८ | आंध्र व्हॅली | १५७२-८ | अलकॉक | ५६० |
| सेंट्रल | १२७ | बॉम्बे ट्रॅम | १०७-८ | न्यू इंडिया | ९१ |
| इंडिया | २३८ | टाटा हायड्रो | १८४-० | शिवराजपुर | ४१-८ |
| इंपी० | २३३० | टाटा पॉवर | १६७५ | टाटा केमिकल | १६-१२ |
| | ५८० | | | टाटा ऑईल | ८२ |
| रिझर्व्ह | १२० | | | विमको | २६२-८ |

गुरुवार दि. २७-३-४७ पासून अद्यापि बाजार बंद आहे.

### कै. श्री. शं. गो. देवधर ह्यांच्या तैलचित्राचें श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या हस्तें अनावरण

मुंबई प्रां. सहकारी बँकेचे १९३८ ते १९४६ पर्यंतचे मॅनेजर, कै. श्री. शं. गो. देवधर, ह्यांच्या पुण्यतिथी दिवशीं, त्यांच्या तैलचित्राचें अनावरण बँकेच्या दिवाणखान्यांत मुंबई सरकारचे अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या हस्तें झालें. त्या प्रसंगीं बँकेचे डायरेक्टर्स व नोकरवर्ग हे उपस्थित होते. कै. श्री. देवधर ह्यांच्याबद्दल त्यांच्या सहकाऱ्यांस वाटत असलेल्या प्रेमाचें एक प्रतीक म्हणून त्यांनीं हें तैलचित्र बँकेस नजर केलेलें असून तें बँकेच्या मध्यवर्ती हॉलमध्यें लावण्यांत आलेलें आहे. अनावरण करण्याची श्री. मेहता ह्यांस विनंति करतांना, बोर्डाचे चेअरमन, श्री. आर. जी. सरय्या, ह्यांनीं कै. देवधर ह्यांच्या कामगिरीचा उल्लेख केला. श्री. देवधर ह्यांनीं बँकेची नोकरी स्वीकारल्यापासून त्यांचा व श्री. मेहता ह्यांचा निकटचा संबंध झाला होता. त्यामुळें श्री. मेहता ह्यांस कै. श्री. देवधर ह्यांच्या गुणांचा चांगला परिचय झालेला होता. त्यांचें श्री. मेहता ह्यांनीं वर्णन केलें. सतत काम करण्याची हातोटी, स्वच्छ विचारसरणी, कामसूपणा, कर्तव्यनिष्ठा, तस्वास चिकटून राहाण्याचा प्रामाणिकपणा, इत्यादींमुळें सहकारी चळवळीचा स्थिर पाया घालण्यास त्यांचा मोठा हातभार लागलेला आहे, असें श्री. मेहता हे म्हणाले.

**भोर स्टेट बँक लि.**—वरील बँकेची शिरवळ येथें नवीन शाखा लवकरच सुरु होणार आहे. बँकेच्या मॅनेजरचे जागीं प्रथमपासून असलेले श्री. काळे हे महाराष्ट्र बँकेकडे परत जात आहेत. त्यांच्या जागीं रिझर्व्ह बँकेंतील श्री. आगाशे ह्यांची नेमणूक झाली आहे.

**हिंदुस्थान टोळधाडीपासून मुक्त**—चालू वर्षीं आतांपर्यंत हिंदुस्थानांतील उभ्या पिकावर टोळधाड पडलेली नाहीं. परंतु अरबस्थान आणि इराकमधून टोळांचे थवे इराणच्या पश्चिमेला आले आहेत.

**कागदाच्या निर्मितीचा खर्च**—हिंदुस्थानांत अगर बाहेर उत्पन्न होणाऱ्या कागदाच्या निर्मितीच्या खर्चाची नक्की माहिती सरकारला सांगतां येणार नाहीं, असें उत्तर मध्यवर्ती असेंब्लींत सरकारतर्फे देण्यांत आलें.

**कोल्हापूर संस्थानांत गुरांचे दवाखाने**—कोल्हापूर सरकारनें संस्थानांतील दहा प्रमुख गांवीं गुरांचे दवाखाने उघडले आहेत.

श्री श्री श्री श्री श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

# दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

| नांगर | —यांचे— | चरक |
| --- | --- | --- |
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | | राजा ( एक बैली ) |

'मधुकर' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.